# जाहिर नोटीस

राज्य शासनाच्या सिंचन व इतर प्रकल्पांसाठी खाजगी क्षेत्रातील जमीन,खाजगी वाटाघाटी व्दारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याचे अनुषंगाने महसुल व वन विभाग,मंत्रालय मुंबई,शासन निर्णय दि.१२-०५-२०१५ व ३०-०९-२०१५ अन्वये मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यांत आलेली आहेत. तसेच शासन परिपत्रक क्र.एलएक्यूएन-०१/२०१७/अ-२अ दिनांक २५-०१-२०१७ अन्वये खाजगी क्षेत्रातील जमीन,खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याचे अनुषंगाने कार्यपध्दती विशद केलेली असुन त्याचे (२)(ब)(एक)अन्वये प्रस्तावाची जाहीर सुचना खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| प्रस्तावाचे नांव | मौजे रोहीनखेड ता.मोताळा येथील जमीनीचे खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने २ भुधारकांचे क्षेत्र २ हे.६७ आर ताब्यात घेणे. |
| भुसंपादन अधिकारी | उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी,मलकापुर |
| यंत्रणा | जिल्हा जलसंधारण जिल्हा,मृद व जलसंधारण विभाग,बुलडाणा |
| यंत्रणा उपविभाग | उपविभागीय जलसंधारण अधिकारी,मृद व जलसंधारण उपविभाग,मलकापुर |
| संपादनाचे प्रयोजन | थड पाझर तलावाचे कामासाठी |

**मौजे रोहीनखेड ता.मोताळा येथील**
**खाजगी वाटाघाटी व्दारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घ्यावयाच्या जमीनीचा गोषवारा**

| अ.क्र. | भुधारकाचे नांव | गट क्र. | संपादीत क्षेत्र हे.आर | वन झाडे,फळ झाडे,बांधकाम इ. |
|---|---|---|---|---|
| १ | पलसिध्द संस्थान व इतर | ३७१ | २.३५ | |
| २ | साबीयाबी मो.रफीक | ३७२ | ०.३२ | |
| | | | २.६७ | |

करीता उपरोक्त नमुद जमीनी बाबत हया जाहीर नोटीस व्दारे कळविण्यांत येत आहे की,

०१. उपरोक्त जमीन खाजगी वाटाघाटी व्दारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यांत घेण्यांत येणारे असल्याने सदर जमीनीचे मालकी हक्काबाबत काही वाद असल्यास, हिस्से वाटे इ.बाबत वाद,न्यायालयीन खटला चालु असल्यास हया जाहीर प्रगटना पासुन ०७ सात दिवसांत उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी बुलडाणा यांचे कार्यालयात शासकीय कामकाजाचे दिवसांत दु०२-०० वा. पावेतो लेखी आक्षेप कागदोपत्री पुराव्यासह तीन प्रतीत सादर करावेत.

०२. उपरोक्त नमुद ०१ नुसार विहीत कालावधीत आलेल्या आक्षेपांबाबतच विचार करण्यात येईल.विहीत मुदती नंतर प्राप्त आक्षेपा बाबत विचार करण्यात येणार नाही.

०३. सदर प्रस्तावाबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकारी हा संबंधीत भुसंपादन अधिकारी यांचा राहील.

०४. उपरोक्त प्रस्तावाची फक्त संयुक्त मोजणी हया जाहीर प्रगटनापासुन ०७ दिवस पावेतो उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी,मलकापुर यांचे कार्यालयीन वेळेत व दिवसा सकाळी ११-०० ते दु.०२-०० पावेतो पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

दि.१८/०५/२०१८

उपविभागीय अधिकारी तथा
भुसंपादन अधिकारी,
मलकापुर.